# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

# उल्हासनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र : २७२०११६, विस्तारीत क्र. : २०८ फॅक्स नं : ०२५१.२७२०१०४

---

जाक्रउमपा/साप्रवि/आस्था/मुली/१३३४/२०२२, दिनांक २६/१२/२०२२

## -:जाहिरात:-

# थेट मुलाखत

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी यांची कमतरता असल्याने महापालिका क्षेत्रातील वैद्यकीय सेवेच्या कामासांठी महापालिकेतील वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी (सेवा निवृत्त) यांची **०६ महिन्यासाठी मानधन तत्वावर** नेमणूक शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ नुसार करार पध्दतीने करावयाची आहे. त्यासाठी दिनांक ०३/०१/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महापालिका, उल्हासनगर-३ यांच्या दालनात **थेट मुलाखत** आयोजित करण्यात आलेली आहे.

**तरी पात्र इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.**

| अ.क्र. | तपशिल | पद संख्या | मानधन | अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (सेवा निवृत्त) | ०२ | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ नुसार मानधनव | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. / बी.ए.एस.एस. (आयुर्वेद) / बी. एच.एम.एस. (होमीओपथी) किंवा शासनमान्य पदवी.<br>ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेतील / खाजगी रूग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाची नियमित सेवा.<br>क) महाराष्ट्र मेडीकल कौन्सील अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक.<br>**उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये काम केले असेल त्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.** |

**अटी व शर्ती :—**

१) सोबतच्या नमुन्यातील परिपुर्ण भरलेला अर्ज आणि खालील कागदपत्रांसह उमेदवाराने थेट मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. अर्ज दाखल करण्यास/मुलाखतीस उपस्थितीबाबत उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे प्रवासभाडे अथवा भत्ते देय राहणार नाहीत.

२) शासकीय सेवेतील सेवा निवृत्तीबाबतचे ओळखपत्र व अंतिम वेतनदाखला (सेवानिवृत्तीपुर्वीचे वेतनदाखला), जन्मतारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अनुषंगीक इतर कागदपत्रांच्या मुळ व साक्षांकित प्रती, पासपोर्ट साईज २ फोटो.

कोणत्याही कारणामुळे मूळ कागदपत्रांशिवाय मुलाखतीस पात्र ठरविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच मुलाखतीवेळी सादर केलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र खोटे/चूकीचे आढळल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.